**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी 18.**

**विद्युत विभाग**

**ई-निविदा सूचना क्र. विद्युत/मुख्यालय/ड/ग/ह/01-08/2026-2027**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडून खालील नमुद केलेल्या कामासाठी ई टेडरिंग पद्धतीने परसेंट रेट निविदा मागविण्यात येत आहे. प्रचलित दराने GST बिलात अदा केली जाईल त्यामुळे GST वगळून दर द्यावेत.

| निविदा नोटीस क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम | बयाणा रक्कम | अनामत रक्कम | कामाची मुदत (महिने) | निविदा फॉर्म फी जीएसटीसह (परत न मिळणारी |
|---|---|---|---|---|---|---|
| 01-01/2026-2027 | चिंचवड मतदारसंघातील ड क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत वाकड पिंपळे निलख येथील ईरोस मेडोस सहकारी गृहरचना संस्था मर्यादित सोसायटीच्या आवारात विद्युत सोलर सिस्टीम बसविणे (खाजगी गृहनिर्माण संस्थेअंतर्गत काम) (आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत वाटा रु. 7.50 लक्ष व गृहनिर्माण संस्था वाटा रु. 2.50 लक्ष) | 819474 | 8195 | 40974 | 4 | 1658 |
| 01-02/2026-2027 | चिंचवड मतदारसंघातील पिंपळे निलख पिंपळे निलख येथील स. नं. 24/1 अ1 येथील अक्षयनगर फेज 1 सहकारी गृहरचना संस्था मर्यादित सोसायटीच्या आवारात विद्युत सोलर बसविणे (आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत वाटा रु. 7.50 लक्ष व गृहनिर्माण संस्था वाटा रु. 2.50 लक्ष) | 847213 | 8472 | 42361 | 4 | 1658 |
| 01-03/2026-2027 | चिंचवड मतदारसंघातील वाकड दत्त मंदीर जवळ स. नं. 240/2 येथील पॅराडीसो सहकारी गृहरचना संस्था मर्यादित सोसायटीच्या आवारात विद्युत सोलर सिस्टीम बसविणे (खाजगी गृहनिर्माण संस्थेच्या आवारातील/अंतर्गत भाग/खाजगी जागा वगळून) (आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत वाटा रु. 7.50 लक्ष व गृहनिर्माण संस्था वाटा रु. 2.50 लक्ष) | 847305 | 8473 | 42365 | 4 | 1658 |
| 01-04/2026-2027 | चिंचवड मतदारसंघातील जुनी सांगवी येथील स. नं. 4/1, 4/2 प्रियदर्शनी नगर, एस. टी. कॉलनी जवळ, साई स्नेह पार्क गृहरचना सहकारी संस्था मर्यादित सोसायटीच्या आवारात विद्युत सोलर सिस्टीम बसविणे (खाजगी गृहनिर्माण संस्था अंतर्गत काम) | 846036 | 8460 | 42302 | 4 | 1658 |
| 01-05/2026-2027 | चिंचवड मतदारसंघातील थेरगाव येथील स. नं. 28, हिस्सा नं. 4, सी.टी.एस. नं. 6290-6291-6292-6294 + 6295 गंगा ओशियन मिडोज हौ. गृहरचना संस्थेच्या आवारात विद्युत सोलर सिस्टीम बसविणे (खाजगी गृहनिर्माण संस्था अंतर्गत काम) | 846356 | 8464 | 42318 | 4 | 1658 |
| 01-06/2026-2027 | चिंचवड मतदारसंघातील जुनी सांगवी गंगानगर परीसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे. | 423715 | 4237 | 21186 | 4 | 1658 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 01-07/2026-2027 | चिंचवड मतदारसंघातील वाकड येथील सम्राट चौकात सार्वजनिक रस्त्यावर दिवाबत्तीची सोय करणे. (हायमास्ट दिवे बसविणे) | 422671 | 4227 | 21134 | 4 | 1658 |
| 01-08/2026-2027 | चिंचवड मतदारसंघातील वाकड येथील स. नं. 130/6, सय़ाजी हॉटेल जवळ, भूमकर चौक यथील वर्व्हे सहकारी गृहरचना संस्था मर्यादित सोसाय़टीच्या आवारात विद्युत सोलर सिस्टीम बसविणे (खाजगी गृहनिर्माण संस्था अंतर्गत काम) | 847024 | 8470 | 42351 | 4 | 1658 |

| **निविदा नोटीस क्र. 01-01 ते 01-08 चे वेळापत्रक** | |
|---|---|
| ई-निविदा उपलब्ध कालावधी | दिनांक - 13/05/2026 ते दि. 27/05/2026 |
| ई-निविदा स्विकृती अंतिम वेळ व दिनांक | दिनांक - 27/05/2026 दुपारी 3.00 वा. |
| निविदा उघडणेचा दिनांक | दिनांक - 29/05/2026 दुपारी 3.00 वा. (शक्य झाल्यास) |

वरील कामांसाठीचा तपशील उदा. बयाणा, अनामत रक्कम, निविदाच्या अटी शर्ती, निविदा शेड्यूल्ड बी इ. माहिती https://mahatenders.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे. सदरची निविदा पध्दत ई टेडरिंग पद्धतीने मनपाच्या वेबसाईटवरून निविदा भरावयाची आहे.

सदरची ई टेडरिंग प्रक्रिये अंतर्गत निविदा वर नमुद केलेल्या दिनांक व नमुद केलेल्या वेळेपर्यंतपर्यंत ई टेडरिंग पद्धतीने वेबसाईटवरुनच भरता येतील. निविदाधारकानी निविदेची फॉर्म फी बयाना रक्कम मनपा पेमेंट गेट वे सिस्टिमद्वारे भरावयाची आहे. कोणतेही कारण न देता निविदा पुर्णतः किंवा अंशतः मंजुर अथवा नामंजूर करण्याचा अधिकार मा. आयुक्त सो. यांनी स्वत:कडे राखुन ठेवला आहे.सदरची निविदा https://mahatenders.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

सदरची ई निविदा प्रणाली वापराबाबत काही तांत्रिक अडचण निर्माण झाल्यास NIC यांचेकडील ई-मेल support-eproc@nic.in अथवा Help Desk Number 0120-4200462,0120-4001002,0120-4001005, 0120-6277787 या दुरध्वनीवर संपर्क साधावा

**सही/-**
**(माणिक चव्हाण)**
**सहशहर अभियंता 2 (वि)**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - 18

जाहिरात क्र.
जावक क्रमांक- विमुका/04/कावि/155/2026
दिनांक- 11/05/2026

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी – 411018.

विद्युत विभाग

सन 2024-2025

निविदा अटी-शर्ती (दि. 02/08/2024 पासून लागू)

१) सदर टेंडर नोटीस https://mahatenders.gov.in या वेबसाईटवर पहावयास मिळेल.

२) A) निविदा धारकाने निविदेची फॉर्म फी व बयाणा रक्कम मनपा खात्यात पेमेंट गेटवे सिस्टिमद्वारे (ई-बँकीग) भरावयाची आहे. ठेकेदारांना कामाचे देयक E.C.S/ NEFT व्दारे अदा करण्यात येतील याबाबत ठेकेदाराने मनपाचे वेबसाईटवरील जोडपत्र-'अ' मधील ई-पेमेंटसाठी नमुना फॉर्म भरून देणे आवश्यक आहे.

इसारा रक्कम ( Earnest Money Deposit) खालीलप्रमाणे भरावी.

i) र. १.५० कोटी रकमेपर्यंतची कामे:- निविदा रकमेच्या १%

ii)रु. १.५० कोटी रकमेवरील कामे :- निविदा रकमेच्या ०.५०% किंवा रु. १.५० लक्ष यापैकी जास्त असेल ती रक्कम.

B) ठेकेदार महापालिकेच्या विदयुत विभागात नोंदणीकृत असणे आवश्यक असणार नाही. तथापि https://mahatenders.gov.in वर ई नोंदणी करणे आवश्यक राहिल. (सार्वजनिक बाधकाम विभागाकडील नोंदणी प्रमाणपत्रावर नमुद नावानेच निविदा भरणे बंधनकारक राहील. नोंदणी प्रमाणपत्रावरील नावा व्यतिरिक्त अन्य नावाने निविदा भरल्यास सदरच्या निविदा या ग्राहय धरल्या जाणार नाहीत.) मनपाच्या सर्व अटी-शर्तींची पुर्तता करणे बंधनकारक राहिल. निविदा भरल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत/कोणत्याही टप्प्यावर पात्र असुनही माघार घेतल्यास अशा ठेकेदारासह सर्व पात्र ठेकेदारांचे दराचे पाकिट उघडणेत येईल. तदनंतर L-१ आल्यास काम करण्यास नकार दिल्यास अनामत रक्कम जप्त करुन १ वर्षाकरिता निविदा भरणेस प्रतिबंध करणेत येईल.

- **१.५ कोटी पेक्षा जास्त निविदेकरिता महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडील रजिस्ट्रेशनची आवश्यकता नाही.**
- **१.५ कोटी पर्यंतच्या रकमेच्या निविदांकरीता महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडील योग्य त्या वर्गातील नोंदणी बंधनकारक राहील. तथापि १.५ कोटीच्या वरील निविदेसाठी पात्र असणा-या ठेकेदारांना महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभागाकडील नोंदणी बंधनकारक असणार नाही.**

३) निविदेसोबत खालील कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे. (पोर्टलवर अपलोड करणे.)

I. महाराष्ट्र शासन उद्योग व उर्जा विभागाकडिल अद्यावत "विद्युत ठेकेदार अनुज्ञाप्ती" नोंदणी प्रमाणपत्र.

II. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग (PWD/CPWD) (विद्युत) यांचेकडील योग्य त्या वर्गातील नोंदणी प्रमाणपत्र प्रत. कंत्राटदार विद्युत नोंदणी वर्ग खालीलप्रमाणे-

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
|---|---|---|---|---|---|
| अमर्याद(अ) | र.२५ लक्ष (ब) | र.१५ लक्ष (ब-१) | र.१० लक्ष (क) | र.७.५० लक्ष (ड) | र.२.००लक्ष (इ) |

III. फक्त पाणीपुरवठा,जलशुध्दीकरणमधील विद्युत (पंपीग मशीनरी) / यांत्रिकी यंत्रणेच्या कामांकरीता PWD/CPWD व M.J.P. (महाराष्ट्र जीवन प्राधिकरण) यांचेकडील योग्य त्या वर्गातील नोंदणी प्रमाणपत्र असणे आवश्यक राहील.

IV. अग्निशमन व प्रतिबंधक यंत्रणेच्या कामाकरिता महाराष्ट्र फायर सर्व्हीसेस (Directorate of Maharashtra Fire services) यांचेकडील मान्यताप्राप्त अनुज्ञप्ती असणे आवश्यक आहे.

V. ट्रॅफिक सिग्नलचे देखभाल दुरुस्ती व उभारणीचे कामासाठी एजन्सीकडे Traffic Signal मधील बाबीचे District Industries Center यांचेकडील स्वत: नोंदणीकृत उत्पादक असलेबाबत प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

VI. नवीन उद्वाहक (Lift) बसविणे/नुतनीकरण/देखभाल दुरुस्ती करणेकरिता मा. **मुख्य विद्युत निरीक्षक, उद्योग उर्जा व कामगार विभाग** यांचा उद्वाहक उभारणी व देखभाल दुरुस्ती करणेबाबतचा परवाना निविदेसोबत एजन्सी किंवा उद्वाहक कंपनी यांनी सादर करणे आवश्यक आहे.

VII. उत्पादक कंपनी/ मे. एन.इ.सी. जपान कंपनीचे EPABX (दुरध्वनी) अधिकृत पुरवठाधारक/दुरुस्ती एजन्सी असलेचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

VIII. अद्ययावत Shop Act लायसन्स / कंपनी ऍक्ट लायसन्स.

IX. GST नोंदणी प्रमाणपत्र

X. भविष्य निर्वाह निधी कार्यालयाकडील नोंदणीप्रमाणपत्र व अद्यावत चलन प्रत

XI. ESI नोंदणी प्रमाणपत्र (लागु असल्यास जोडणेत यावे.)

XII. लगतच्या ३ वर्षाचे आयकर रिर्टन प्रमाणपत्र

XIII. भागीदारी संस्था असल्यास भागीदारी करारनामा व पॉवर ऑफ अॅटर्नी

XIV. Bank Solvency, तसेच Bid capacity व Turnover Certificate (अद्ययावत) सर्टिफिकेट जोडण्यात यावे. (C.A.कडील प्रमाणित प्रमाणपत्र)

XV. B-1 व B-2 फॉर्म स्वाक्षरी करून तसेच Statement I II III IV यांची पुर्तता करून द्यावी लागेल.

XVI. <u>मागील</u> तीन वर्षात अशा प्रकारचे शासकीय/निमशासकीय/शासन मान्य संस्थेकडील निविदेच्या कामातील प्रकारानुसार काम केल्याबाबतचे प्रमाणपत्र असे प्रमाणपत्र कार्यकारी अभियंता दर्जाच्या अधिका-याने दिलेले असावे.

XVII. निविदाकार यांनी निविदेसोबत जोडलेली (अपलोड केलेली) सर्व कागदपत्रे खरी असल्याबाबतचे **प्रतिज्ञापत्र र.रु. १००/- चे स्टॅम्प पेपरवर नोटराईज्ड करुन लिफाफा क्र. १ मध्ये जोडणे आवश्यक आहे.**

XVIII. <u>**लिफाफा क्र. १ मध्ये जोडणेत आलेली कागदपत्रे निविदा मंजुरीनंतर, देयक अदा करतांना खोटी व बनावट असल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित ठेकेदार यांची बयाणा / अनामत रक्कम जप्त करुन त्यांना निविदा भरणेस प्रतिबंध (Black list) करण्यात येवून त्यांच्यावर आर्थिक बाब असलेस भारतीय दंड विधान संहितेनुसार कार्यवाही पात्र राहील. खोट्या / बनावट कागदपत्रांसाठी संबंधित ठेकेदार पूर्णपणे जबाबदार राहील त्यास म.न.पा. चे अधिकारी जबाबदार राहणार नाही.**</u>

XIX. L1 कंत्राटदार/ठेकेदार यांनी स्वत:चे नाव, नजीकच्या काळातील फोटो, पत्ता व स्वाक्षरीचा नमुना स्वत:च्या संस्थेच्या लेटरहेडवर सादर करावा आणि स्वत: उपस्थित राहणार नसल्यास त्यांनी निविदा विषयक संपूर्ण कामकाजासाठी नियुक्त केलेल्या प्रतिनिधीची माहिती (नाव,फोटो, पत्ता व स्वाक्षरीसह) र.रु ५००/- चे स्टॅम्प पेपरवर मुखत्यारपत्र नोटराईज्ड करुन कार्यालयास देणे बंधनकारक राहील.

४) तात्पुरते ध्वनीक्षेपन, दूरसंचार, EPABX, अग्निशमन, सौरउर्जा यंत्रणा नविन/ चालन देखभाल दुरुस्ती करणे नुतनीकरण करणे किंवा चालन देखभाल दुरुस्ती करणे इत्यादी कामाकरिता विद्युत अनुज्ञाप्ती ची आवश्यकता नाही. P.W.D. रजिस्ट्रेशनची आवश्यकता नाही.

५) निविदेसोबत आवश्यक कागदपत्रांच्या प्रती स्कॅन करुन अपलोड करणे आवश्यक असुन निविदा बीड लॉक झालेनंतर निविदांबाबत वरीलप्रमाणे कागदपत्रांची "हार्ड कॉपी" एका प्रतीत कार्यालयीन तीन दिवसाचे आत प्रती प्रमाणित करून सादर करावी. अन्यथा दराचे दुसरे पाकीट उघडणेत येणार नाही व यास संबंधित ठेकेदार जबाबदार राहील.

६) ठेकेदार पात्र/अपात्र तक्ता बाबत (शॉर्ट फॉल) <u>https://mahatenders.gov.in</u> या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येतील, अपात्र ठेकेदार यांनी <u>**त्यांची कागदपत्रे प्रसिध्दीचे दिनांकापासून ३ दिवसात https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर शॉर्ट फॉल मध्ये अपलोड करावीत. तदनंतर आलेल्या कागदपत्रांचा विचार केला जाणार नाही.**</u>

७) विद्युत / गॅस दाहिनी नवीन / नुतनीकरण /चालन देखभाल दुरुस्ती या कामाकरिता मुळ विद्युत/गॅस फर्नेस उत्पादित कंपनी यांनी दर सादर करावेत.विद्युत अनुज्ञाप्तीची आवश्यकता आहे.

८) निविदा दर हे निविदा पाकीट उघडलेचे तारखेपासून १२० दिवसाकरीता ग्राह्य राहतील परंतू अपवादात्मक परिस्थितीत ग्राह्यता कालावधी वाढवणे बाबत विभागप्रमुख व त्यांचे प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांनी विचारणा केल्यास ग्राह्यता कालावधी वाढवून द्यावा लागेल अथवा निविदा रद्द करणेत येईल.

९) ठेकेदाराने अंदाजपत्रकीय रकमेच्या १०% पेक्षा जास्त कमी निविदा दर केल्यास, निविदा दराबाबत निविदा उघडल्यानंतर ३ दिवसात सविस्तर दर पृथःकरण सादर करणे बंधनकारक आहे. यासाठी स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही. निविदा रक्कमेच्या ३०% व त्यापेक्षा अधिक कमी असल्यास किमान तीन जास्त बाबींचे दर पृथ्थकरण सादर करणे आवश्क आहे.

१०)अटींयुक्त निविदा स्विकारली जाणार नाही.

११)करारनामा स्वखर्चाने दिलेल्या मुदतीत (स्वाक्षरी व डाव्या हाताच्या अंगठयाच्या ठसा सह)करून द्यावा लागेल. अन्यथा निविदा रद्द करणेत येईल.

१२)महाराष्ट्र शासन यांचेकडील नोंदणीकृत सुशिक्षित बेरोजगार अभिंयता संवर्गातील ठेकेदारांना खालीलप्रमाणे अटी शर्ती सवलत लागू राहिल.

A. सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे योग्य त्या वर्गातील नोंदणी करुन नोंदणी प्रमाणपत्र निविदा भरताना सादर केल्यास, एक किंवा जास्तीत जास्त पाच कामे असे एकूण रक्कम रुपये ५० लाख मर्यादेपर्यंतची कामे घेता येतील. या कामांसाठी अनुभव व उलाढाल या अटीमध्ये सूट देणेत येवुन, निविदा भरणेसाठी पात्र समजणेत येईल. सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांनी निविदा भरतेवेळी सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडील निविदा नोंदणी पुस्तीका (passboook) छायांकिंत प्रत सादर करणे बंधनकारक आहे. एकुण ५० लाख मर्यादेपर्यंची कामे पुर्ण झाल्यानंतर सदरचे सुशिक्षित बेरोजगार अभिंयता नोंदणी प्रमाणपत्र अन्वये दिलेल्या सवलती ग्राहय धरले जाणार नाही.

B. सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना सर्व कामांना सुरक्षा अनामत रकमेमध्ये देणेत येणारी ५०% सुट बाबतची अट रद्द करणेत येवुन, मुद्दा अ नुसार प्रथम मिळालेल्या पाच किंवा र.रु. ५० लाख पर्यंतच्या कामासाठी अनामत रकमेमध्ये ५०% सुट अनुज्ञेय राहील, पुढील निविदांसाठी सर्वसाधारण ठेकेदारांप्रमाणे ५% सुरक्षा अनामत निविदा अटी शर्तीप्रमाणे भरावी लागेल.

C. सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना या पुर्वी एकही काम मिळालेले नाही अथवा मिळालेल्या निविदा कामांची माहिती सोबत दिलेल्या नमुन्याप्रमाणे बंधपत्र पत्राव्दारे सादर करणे बंधनकारक राहिल.

१३) र.रु. १ कोटी पेक्षा जास्त रकमेच्या कामांना खालीलप्रमाणे पोस्ट क्वालीफिकेशन क्रायटेरीयाची तरतुद असेल. अनुभव, परिमाण (यासाठी केलेल्या कामांच्या बिलांच्या छांयाकित प्रती), उलाढाल, सक्षमता इत्यादीबाबत खालीलप्रमाणे पुर्तता करणे बंधनकारक असेल

| | | |
|---|---|---|
| १ | मागील ५ वर्षातील कंत्राटदाराची कमाल उलाढाल | देय असलेल्या कामाच्या वार्षिक किंमतीच्या कमीत कमी ७५ टक्के इतकी असावी<br>(वार्षिक किंमत )= कामाची एकुण किंमत / कामाचा कालावधी वर्षात |
| २ | मागील ५ वर्षात कंत्राटदाराने तुल्यबळ किंमतीचे किमान एक त्याच स्वरुपाचे काम पुर्ण केले असले पाहिजे त्याची कमीत कमी किंमत | देय कामांच्या किमंतीनुसार (प्रचलित दराने)<br>अ. तीन सारख्या पध्दतीची कामे ज्यांची काम निहाय किंमत बोलावण्यात आलेल्या निविदेच्या अंदाजित रकमेच्या ४०% पेक्षा कमी नसावी.<br>किंवा<br>ब. दोन सारख्या पध्दतीची कामे ज्यांची काम निहाय किमंत बोलावण्यात आलेल्या निविदेच्या अंदाजित रकमेच्या ५०% पेक्षा कमी नसावी.<br>किंवा<br>क. एक सारख्या पध्दतीचे काम ज्याची किंमत बोलाण्यात आलेल्या निविदेच्या अंदाजित रकमेच्या ८० पेक्षा कमी नसावी. |

| | | |
|---|---|---|
| ३ | देय कामासाठी मागील ५ वर्षापैकी कोणत्याही एका वर्षात ज्या महत्वाच्या परिमाणाच्या बाबी करावयाच्या आहेत त्याचे कमीत कमी परिमाण | देय कामातील महत्वाच्या व आवश्यक जास्त परिमाण असणा-या कमाल ५ व किमान ३ बाबींचे परिमाण नमद करणेत यावे व या बाबींची एकुण किंमत निविदा किंमतीच्या ३०% पेक्षा जास्त रकमेची नसावी. (यासाठी केलेल्या कामांच्या बिलांची छांयाकित प्रती) |
| ४ | कंत्राटदाराची निविदा भरण्याची सक्षमता (बिड कपॅसिटी) | कंत्राटदाराची निविदा भरण्याची सक्षमता (बिड कपॅसिटी)<br>(ए X एन X 1.5) – बी<br>जेथे ए = मागील पाच वर्षातील जास्तीत जास्त वार्षिक उलाढाल<br>एन =देय कामाचा कालावधी<br>बी =हातातील कामांची किंमत ( देय कामांच्या कालावधीतील) |

१४)महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र. सीएसटी/२०१७/ प्र.क्र.०८/इमा.२ दिनांक २७/०९/२०१८ अन्वये परफॉर्मन्स सिक्युरिटी अनामत ई निविदा प्रणालीद्वारे खालीलप्रमाणे भरावी लागेल. परफॉर्मन्स सिक्युरिटी अनामत लिफाफा क्र. २ उघडल्यानंतर प्रथम न्यूनतम देकार सादर करणा-या L-१ निविदाकाराने " Additional performance Security Deposit " आठ दिवसाच्या आत संबधित कार्यकारी अभियंता यांचेकडे जमा करावी. यामध्ये कोणत्याही प्रकारे सवलत देय तसेच मागणीसाठी पत्रव्यवहार केला जाणार नाही राहणार नाही, तसेच मागणीसाठी पत्रव्यवहार केला जाणार नाही. मुदतीत " Additional performance Security Deposit " सादर न केलेस L-1 यांची निविदा रद्द करणेत येवुन L-2 यांना विचारणा करणेत येईल. **<u>तसेच L-1 निविदाकाराची बयाणा रक्कम जप्त करुन त्यांना १ वर्ष निविदा भरणेस प्रतिबंध (Black List) करून L-2 यांना विचारणा करणेत येईल.</u>**

a. निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किमतीपेक्षा १% पेक्षा जादा (उदा.१.०१ पासुन पुढे) ते १०% पर्यंत कमी दरांचा असेल तर ठेकेदारांनी निविदाधीन किमतीच्या १% रक्कम परफॉर्मन्स सिक्युरीटी म्हणून भरणे आवश्यक आहे.
b. निविदा देकार अंदाजपत्रकीय दरापेक्षा १% पर्यंत कमी असल्यास अतिरिक्त सुरक्षा अनामत भरण्याची आवश्यकता नाही.
c. निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किमतीपेक्षा १०% ते १५% कमी दराने असेल तर देकार १०% पेक्षा जेवढया जास्त दराने कमी आहे तेवढी रक्कम परफॉर्मन्स सिक्युरीटी म्हणून मनपाचे ई-निविदा प्रणालीद्वारे भरणे आवश्यक आहे. (उदा. १५% कमी दर - १% पेक्षा जास्त ते १०% पर्यंत करीता – १% व (१५% -१०%) –५% असे एकूण ६%). परफॉर्मन्स सिक्युरीटी रक्कम डी. डी./ एफ. डी. आर. अथवा बँकेची प्रतिभुती हमीव्दारे भरता येईल.
d. निविदेचा देकार १५% पेक्षा कमी दराचा असल्यास उर्वरित रकमेसाठी दोन पटीने रक्कम सादर करणे अनिवार्य राहील.

   उदा. १९ % कमी दरासाठी खालीलप्रमाणे पृथकरण :-
   १०% कमी दरापर्यंत १% व
   १५% कमी दरापर्यंत -( १५% -१०% =५% )
   तसेच ( १९-१५ )=४% करीता (४x२ = ८% )
   असे एकूण ( १+५+८=१४% )
   तसेच १०% पेक्षा जास्त कमी दर असल्यास अतिरिक्त कामगिरी सुरक्षा ठेव सोबत निविदेतीतील बाबींचे दरपृथ:करण (Rate Analasys) सादर करणे बंधनकारक आहे.

e. लिफाफा क्र.२ (दराचे पाकीट ) उघडताना सर्व निविदाधारकांनी स्वत: किंवा त्याच्या प्रतिनिधींनी प्रत्यक्ष उपस्थित राहणे आवश्यक आहे. अन्यथा **ऑनलाईन पध्दतीने** निविदा उघडण्यात येतील.

f. ज्या निविदाधारकाला काम मिळेल त्याची परफॉर्मन्स सिक्युरीटी नियमानुसार काम समाधानकारकपणे पुर्ण झाल्यावर एक महिन्यानंतर परत मिळेल.

g. बँक प्रतिभुती हमी महापालिकेने विहित केलेल्या नमुन्याप्रमाणे सादर करावी. **(बँक गॅरंटीची मुदत ही कामाचा कालावधी इतकी + १ वर्ष असणे बंधनकारक आहे. (बँक गॅरंटी ही** मा. आयुक्त, पिं.चिं.मनपा. यांचे नावे असेल)

h. सुरक्षा ठेव खालीलप्रमाणे एकुण ५% राहील.

A) रु.१.५० कोटी पर्यंतच्या कामांकरिता (१% बयाणा रक्कम, २% FDR, २% देयकातून कपात) अशी एकुण ५% राहील.

B) रु.१.५० कोटी रकमेवरील कामांकरीता (०.५०% बयाणा रक्कम, १% FDR, ३.५०% देयकातून कपात) अशी एकुण ५% राहील.

FDR ची रक्कम खालील स्वरुपात भरावी तसेच सदरची रक्कम नजीकच्या १ हजारच्या पटीत असेल

A) मनपा कोषागारात रोख स्वरुपात भरावी व त्याची मुळ पावती विभागाकडे सादर करावी.

B) भारतीय डाक विभागाकडील राष्ट्रीय बचत प्रमाणपत्र आयुक्त, पिं.चिं.मनपा. यांचे नावे, पिंपरी चिंचवड शहर येथे देय असलेले

C) राष्ट्रीयकृत अथवा शेडयुल्ड बँकेकडील बँक गॅरंटी स्वरुपात, आयुक्त, पिं.चिं.मनपा. यांचे नावे, मनपाचे विहित नमुन्यात, पिंपरी चिंचवड शहर येथे देय असलेली.

D) राष्ट्रीयकृत अथवा शेडयुल्ड बँकेकडील मुदतठेव प्रमाणपत्र, आयुक्त, पिं.चिं.मनपा. यांचे नावे, पिंपरी चिंचवड शहर येथे देय असलेले.

१५)i) भविष्य निर्वाह निधी कायदा १९५२, कंत्राटी कामगार(नियमन व निर्मुलन ) अधिनियम १९७० या कायद्यातील सर्व कायदेशीर बाबीची पूर्तता स्वत: ठेकेदार यांनी करावयाची आहे.

ii) ESI / PF पूर्तता करणे तसेच कामगार संख्या त्यांची हजेरी व वेतनपत्रके इ. कागदपत्रे कामाच्या साईटवर ठेकेदार यांनी उपलब्ध करावयाची आहे. तसेच देयेके सादर करताना कर्मचारी संख्या व त्यानुसार भरलेल्या कर्मचारी निहाय PF ची चलने प्रत्येक बिलासोबत जोडणे आवश्यक आहे. सदरची पुर्तता देयेके सादर करताना आवश्यक आहे.

१६)शासनाकडील सुधारित/ नविन कर/ फी भरण्याची व पूर्तता करणेची जवाबदारी संबधित ठेकेदाराची राहील.

अ) G S T बाबत.

i) ठेकेदारांनी निविदेचा दर देताना जीएसटी वगळून इतर सर्व करांचा विचार करुन द्यावा. निविदा स्वीकृत रक्कमेवर प्रचलित दराने वस्तु व मेवा कर विकास कामाचे बिलात अदा करणेत येईल.

ii) महापलिकेने वेळोवेळी वस्तु व मेवाकराबाबत अवलंबविलेले धोरण कळविणेत येईल व ते ठेकेदारांवर बंधनकारक राहिल.

१७)निविदेच्या B-1 व B-2 फॉर्म मधील अटी व शर्ती ठेकेदारांवर बंधनकारक राहतील याची ठेकेदारांनी काळजीपुर्वक नोंद घ्यावी.

१८)ज्या ठेकेदारास कामाचे आदेश देण्यात येतील अशा ठेकेदारांनी सदर कामाचा व कामगारांचा सर्वसमावेशक विमा (Contractor All Risk Insurance Policy) महाराष्ट्र शासनाच्या शासकीय विमा निधीकडे नियुक्त केलल्या विमा कंपनीकडे सात दिवसात विमा उतरविणे बंधनकारक आहे. तसेच सदर विमापत्रकांखाली तृतीय पक्ष दायित्व व इतर जोखीम अतिरिक्त विमा हप्ता भरुन विमाछत्रिय करणेत यावी.

१९) **विद्युत विभागाकडील सर्व कामांकरीता एका नोटीशीमधील एका ठेकेदारास जास्तीत जास्त ५ कामे घेता येतील.**

२०)इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार व सेवाशर्ती)अधिनियम १९९६ व इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर नियम १९९८ अंतर्गत १% उपकर ठेकेदारांचे बिलातून वसूल करण्यात येईल.तसेच शासनाकडील शासन निर्णायानुसार वेळोवेळी आकारण्यात येणारे कर/फी ही ठेकेदारावर बंधनकारक असेल.

२१)ज्या ठेकेदारास अथवा ठेकेदारी संस्थेस काम मिळेल अशांकडून करारनामा करणेपूर्वी असा ठेकेदार/ठेकेदारी संस्था मनपाचे विद्यमान नगरसेवक / स्विकृत सदस्य यांचेशी संबंधित नाही याची खातरजमा होणेकरीता र.रू. १००/- चे जनरल स्टँम्पपेपरवर संबंधित ठेकेदार /ठेकेदारी संस्थेस प्रतिज्ञापत्र करून द्यावे लागेल.

२२)ज्या कामांच्या शेड्युल बी मध्ये एल.ई.डी. फिटींगची बाब समाविष्ठ आहे, अशा एल.ई.डी. फिटींग संबधीत सविस्तर तांत्रिक विवरण निविदा सुचनेसोबत जोडलेले आहे. त्याचे गांर्भीयाने अवलोकन व्हावे.

२३)कामावर वापरलेले साहित्य कमी दर्जाचे आढळुन आल्यास, असे साहित्य ठेकेदाराने स्वखर्चाने काढून, त्याऐवजी योग्य प्रतीचे साहित्याचा पुरवठा व उभारणी स्वखर्चाने करुन द्यावी लागेल. निविदा सुचनेसोबत जोडलेल्या मान्यताप्राप्त साहित्याचे यादीचे अवलोकन व्हावे. निविदा सादर करण्याचे मुळ तारखेस मान्यता असलेले साहित्यच फक्त वापरता येईल.

२४)हातातील कामांची उर्वरित किंमत बिनचुक नविन मिळालेली कामे लेटरहेडवर परिपुर्णरित्या सादर करणे कंत्राटदारांवर बंधनकारक राहील. तसेच देय कामांसाठी निविदा सादर केल्यानंतर बीड लॉक झाल्यानंतर पण त्यासंबधी अंतिम निर्णय होण्यापुर्वी एखादे नविन काम मिळाल्यास त्या संबधीची माहीती त्वरित सादर करणे देखील कंत्राटदारांवर बंधनकारक राहील. ठेकेदार यांचे सनदी लेखापालाकडील (CA) अद्यावत (निविदा सादर केलेल्या तारखेपासून लगतच्या 3 महिन्यामधील) बीड कॅपॅसिटी ग्राह्य धरणेत येईल. बिड कॅपॅसीटी पुर्ण झाल्यानंतर त्या पुढील निविदा उघडल्या जाणार नाहीत. (बिड कॅपॅसिटीचा विचार करताना इतर शासकीय कार्यालयातील, क्षेत्रिय कार्यालयातील कामे, मुख्य कार्यालयातील यापुर्वी मिळालेली अथवा L-1 आलेली कामे विचारात घेतली जातील.)

२५)विद्युत कामांचा दर्जा इंडियन इलेक्ट्रीसीटी कायदा व नियमानुसार करुन सदर उभारणी चालु करण्यास योग्य असलेचा दाखला आवश्यकतेप्रमाणे विद्युत निरीक्षक, सा. बां. वि., महाराष्ट्र राज्य यांचेकडुन स्वखर्चाने सादर करणेची जबाबदारी ठेकेदाराची राहील. तसेच काम पुर्ण केलेनंतर सदर काम कार्यान्वित करुन मनपास/मराविवि कंपनीस मुदतीत हस्तांतरीत करण्याची जबाबदारी ठेकेदारीची राहील. महानगरपालिकेच्या वेबपोर्टलवर निविदा विभागात विद्युत विषयक कामांचे तपशिल पार्ट १ व पार्ट २ मधील नमुद सुचनांचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

२६)मराविवि कंपनी संबधीचे कामाबाबत त्यांचे अधिका-याशी समन्वय साधुन कामाची अंदाजपत्रके तयार करुन घेणे व सर्व अंदाजपत्रकांना मंजुरी घेणे, पर्यवेक्षकीय शुल्क अदा करणे आणि कामे त्यांचे पर्यवेक्षणाखाली पुर्ण करणे, मराविवि कंपनीस हस्तांतरण करणे ठेकेदारावर बंधनकारक राहील. अंदाजपत्रक मंजुरीस विलंब लागला ह्या सबबीवर मुदतवाढ दिली जाणार नाही. तसेच म.रा.वि.वि. मंडळाची मंजुर अंदाजपत्रकाची प्रत ठेकेदाराने सादर केल्याशिवाय प्रथम चालु बिल देणेत येणार नाही. हस्तांतरण झाले शिवाय अंतिम बिल अदा केले जाणार नाही. पर्यवेक्षण शुल्क ठेकेदाराने अदा करावे व त्यांचे समायोजन मनपाचे वतीने केले जाईल.

२७)A) अग्निशमन व प्रतिबंधक यंत्रणेचे कामाकरीता कामास सुरुवात करणेपुर्वी व काम पुर्णत्वानंतर वेळोवेळी आवश्यक असणा-या चाचण्या, तपासण्या व त्यानुसार कायदेशीर आवश्यक ठरणारी प्रमाणपत्रे, सक्षम अधिका-याचे कार्यालयातुन स्वखर्चाने प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील.

B) अग्निशमन संबधित चालन व देखभाल दुरूस्ती कामात अग्निशमन व प्रतिबंधक संपुर्ण यंत्रणेची तपासणी व चाचणी महिन्यातुन एक वेळा करावी लागेल. तसेच सदर चाचणी सक्षम प्राधिकारी यांच्या देखरेखखाली करुन तपासणी/चाचणी अहवाल सादर करणे बंधनकारक राहील. तसेच महिन्यातुन एकदा किंवा संबधित प्राधिकारी यांचे सुचनेप्रमाणे मनपा अग्निशामक विभागाकडिल अधिकारी/कर्मचा-याच्या उपस्थितीत चाचणी (Mock Drill) करुन देणेची जबाबदारी संबधित एजन्सीची राहील.

२८)ज्या ठेकेदारास कामाचा आदेश दिला जाईल, त्याकडून पुरवठा केलेल्या प्रमुख साहित्यांपैकी, त्या साहित्यांची तांत्रिक तपासणी शासकीय प्रयोग शाळेतुन (COEP) स्वखर्चाने मुदतीत करुन द्यावी लागेल व प्रथम बील अदायगीपुर्वी टेस्ट रिपोर्ट सादर करावे लागतील. एल.ई.डी. फिटींग संबधीत सविस्तर तांत्रिक विवरण व विशेष नोंदीचे अवलोकन करुन दर द्यावेत. तसेच मा.विद्युत निरिक्षक यांची वीजसंच मांडणी / जनित्रसंच कार्यान्वीत करण्याची परवानगी घेणेची जबाबदारी ठेकेदाराची राहील. LED फिटींगचे लॅबची तपासणी रक्कम संबधित ठेकेदारास अदा केली जाईल.

**२९)A) कामांवर वापरावयाचे प्रमुख साहित्याची तांत्रिक तपासणी, कार्यकारी अभियंता यांचे आवश्यकतेनुसार, उत्पादक कंपनीच्या उत्पादन स्थळी ठेकेदाराने स्वखर्चाने करुन देणे व तात्रिंक क्षमता प्रमाणपत्र सादर करणे ठेकेदारावर बंधनकारक राहील. LED फिटींग्ज उत्पादीत कंपनीद्वारे घेणे आवश्यक राहील.**

B) मराविविकंलि संबधित कामासाठी, मराविविकंलि कडील अभियंता यांचेसह उत्पादकाचे उत्पादनस्थळी तांत्रिक तपासणी स्वखर्चाने करणेची जबाबदारी ठेकेदाराची राहील. त्यानंतर साहित्यापोटी प्रथम बील अदा करणेत येईल.

C) विकास कामांकरीता संबधित कामांच्या इंजिनिअर इनचार्ज यांचे मागणीनुसार शासकीय/निमशासकीय संस्थेमार्फत Third Party पर्यवेक्षण, निरिक्षण चाचणी स्वखर्चाने ठेकेदाराने करुन घेणे बंधनकारक राहील.

३०)करारनामा मा. स्थायी समिती सभा सदस्यांकडुन स्वाक्षरीत व मोहोरबंद झाल्या शिवाय कामाचे आदेश दिले जाणार नाही.

३१)महाराष्ट्र शासनाकडील बालकामगार कायदा व अन्य कायदे यांची पुर्तता करणे संबंधीत ठेकेदारावर बंधनकारक राहील.

३२)एजन्सीने / ठेकेदाराने काम करताना सर्व सुरक्षित उपकरणांचा वापर करणे तसेच कामगारांना सुरक्षित उपकरणे देणेची जबाबदारी एजन्सीची राहील. तसेच कामावर पर्यवेक्षक **तांत्रिक अर्हताधारक** नेमणे आवश्यक आहे, अन्यथा कडक कारवाई करणेत येईल.

३३)मराविविकं संबंधीत कामातील साहित्याचा हमी कालावधी १८ महिने राहिल व कामाचे वर्कमनशिप करितांचा कालावधी ६० महीने इतका राहील.

३४)कामांअंतर्गत कोणत्याही बाबींसाठीचे, रस्त्यास समांतर अथवा आडवे खोदकाम करताना इतर कोणत्याही बाबींचे नुकसान झाले तर त्याची स्वखर्चाने भरपाई करुन देणे ठेकेदारावर बंधनकारक राहील. तसेच काम पुर्ण झाल्यावर सदर ठिकाणचा रस्ता/फुटपाथ/पेव्हींग ब्लॉक, रस्त्यावरील सर्व राडारोडा उचलुन रस्ता समपातळीत करुन द्यावा. जर सदर कामाची गुणवत्ता / दर्जा राखला नाही तर, सदर कामावरील होणारा दुरुस्तीचा खर्च अंतिम बिलातून अथवा सुरक्षा ठेव रकमेतून वसुल करणेत येईल. रस्त्यावरील खोदाई व रस्त्यास समांतर/आडवी खोदाई करणेपुर्वी सदर खोदाईस स्थापत्य विभागाची परवानगी आहे काय ? याची खात्री करुन घेणे आवश्यक आहे.

३५)काम करताना कोणत्याही प्रकारचा अपघात अथवा प्राणहानी झाली तर त्याची सर्वस्वी कायदेशीर जबाबदारी फक्त संबंधीत ठेकेदाराची राहील. त्यासाठी कामगारांची विमा पॉलिसी असणे बंधनकारक आहे.

३६)काम करताना कोणत्याही बाबींचे शेडयुल बी मधील परिमाणामध्ये २५% पेक्षा जास्त वाढ होणार असल्यास, कार्याकारी अभियंता यांची लेखी परवानगी शिवाय वाढीव काम करु नये. सह शहर अभियंता यांची लेखी पूर्वपरवानगी शिवाय वाढीव काम केल्यास सुधारीत दर अनुज्ञेय असणार नाही याची ठेकेदारांनी नोंद घ्यावी.

३७)काम करतेवेळी जादा बाब करावी लागल्यास, जर सदर कामाची निविदा अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा कमी दराची असेल तर, सदर निविदा स्विकृती दराने जादा बाबीसाठी दर मंजूर केला जाईल. निविदा जादा दराची असेल तर जादा बाबींसाठी अंदाजपत्रकीय दराने (At Par)/ चालु दर सुची/ बाजारभावप्रमाणे / तडजोडीनुसार जादा बाबीचे काम करणे ठेकेदारावर बंधनकारक राहील. अंतिम निर्णय कार्यकारी अभियंता यांचा राहील.

३८)परिशिष्ट – ब मध्ये नमुद असलेले परिमाण अदमासे आहे. कार्यारंभ आदेश प्राप्त झाल्यानंतर ठेकेदाराने पिं. चि. मनपाचे कनिष्ठ / उप अभियंता यांचेसह त्वरीत संयुक्तित कार्यस्थळ पाहणी करुन, बाबनिहाय आवश्यक साहित्याचे

परिमाणाची निश्चिती करावी व त्यास मा. कार्यकारी अभियंता (वि) यांची मान्यता घ्यावी व त्यानुसार बाजारातून साहित्य उपलब्ध करुन घ्यावे. आवश्यकतेपेक्षा जास्त खरेदी केलेल्या परिमाणासाठी आगाऊ रक्कम अदा केली जाणार नाही अथवा त्याची जबाबदारी मनपाची राहणार नाही. ज्या परिमाणाकरिता आगाऊ रक्कम अदा केली आहे असे सर्व साहित्याची साईटवरुन उभारणी करणे आवश्यक आहे. शिल्लक राहणारे साहित्य पिं. चिं. मनपा ताब्यात घेणार नाही व अंतिम देयक अदा करतेवेळी शिल्लक राहिलेल्या साहित्याची नियमाधीन रक्कम वसुलात आणणेत येईल ह्याची नोंद घ्यावी.

३९)

A) निविदेनुसार बसविलेल्या एलईडी फिटींग पैकी बंद असलेल्या फिटींगची माहिती ठेकेदारास ई- मेल/ एसएमएस/लेखी/भ्रमणध्वनीद्वारे कळविल्यानंतर २ दिवसात नविन फिटींग बसविणे अथवा दुरुस्त करणे ठेकेदारास बंधनकारक राहिल. अन्यथा सह शहर अभियंता यांचे मान्यतेने प्रतिदिन प्रती फिटींग र.रु.२००/- इतके शुल्क १५ दिवसांपर्यंत वसुल करण्यात येईल व त्यानंतर त्यापुढे प्रतिदिन प्रति फिटींग र.रु.३००/- इतके शुल्क नुकसान भरपाई वसुल करण्यात येईल. देखभाल व दुरुस्ती कामाचे कामनिहाय रजिस्टर मेन्टेंन करण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील. दंडात्मक कार्यवाही ही सह शहर अभियंता यांचे मंजुरीने केली जाईल.

B) एलईडी फिटींगचा हमी कालावधी हा काम पूर्ण झालेपासून १ वर्ष असेल. हमी कालावधीमध्ये फिटींगची दुरुस्ती करुन देणे ठेकेदारास बंधनकारक असेल. हमी कालावधीमध्ये एलईडी फिटींग दुरुस्त करुन देणेबाबत ठेकेदाराने टाळाटाळ केलेस प्रतिदिन प्रती फिटींग र.रु २००/- इतके शुल्क १५ दिवसांपर्यत वसुल करण्यात येईल व त्यानंतर त्यापुढे प्रतिदिन प्रति फिटींग र.रु ३००/- इतके शुल्क नुकसान भरपाई वसुल करण्यात येईल. विलंब शुल्क लावणे व त्याची वसूल करणेचे अधिकार कार्यकारी अभियंता(वि) यांना असतील.

४०)A) लिफ्ट करिता लागणा-या सर्व आवश्यक परवानग्या व ना हरकत दाखले प्राप्त करणेची जबाबदारी ठेकेदारांची राहील. तसेच शासनाचे निरीक्षण शुल्क व इतर आवश्यक सर्व शुल्क अदा करण्याचे जबाबदारी ठेकेदाराची राहील. मनपा यासाठी कोणतेही अतिरिक्त शुल्क ठेकेदारांस अदा करणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

B)निविदा सादर करताना ज्याठिकाणी नवीन उद्वाहक (लिफ्ट) बसवायचे आहे त्या ठिकाणचा उद्वाहक कंपनीचा संक्षिप्त अहवाल निविदेसोबत सादर करणे आवश्यक आहे. ( उद्वाहक अहवाल मध्ये Passenger Capacity, Duct Size, Car Size, Detail Drawing etc नमूद करणे आवश्यक आहे )

४१) दुरसंचार विभागाकडील वायरलेस व वॉकीटॉकी संदर्भातील कामासाठी वर्क ऑर्डरचे पुर्वी अग्रिमेंट करताना संबधित ठेकेदाराने Govt of India चे संचार मंत्रालयाकडील DPL " Dealer possession License " सादर करणे बंधनकारक आहे.

४२)जनित्रसंच दुरुस्तीचे काम हे उत्पादित कंपनीचे अधिकृत सर्व्हीसधारक यांचेबरोबर करारनामा नोटराईज्ड करुन एजन्सी मार्फत पार्टस बदलणे, सर्व्हिसिंग करुन घेणे, ठेकेदारास बंधनकारक राहील. तसेच कंपनीच्या सर्व्हीस इंजिनिअरचा वेळोवेळी सर्व्हीस रिपोर्ट व काम पुर्ण झालेनंतरचा रिपोर्ट जोडणे आवश्यक आहे.

४३) विकास कामाचा काम पुर्णत्वाचा विहीत (मुळ) कालावधी १२ महीने व त्या पेक्षा कमी आहे. अशा कामांना भाववाढ कलम लागु राहणार नाही. तसेच रक्कम रुपये १ कोटी पेक्षा कमी असलेल्या कामांना भाववाढ कलम लागु राहणार नाही.

४४)निविदाधारक व मनपामध्ये कामाच्या अनुषंगाने कोणत्याही प्रकारचा वाद/विवाद उद्भवल्यास लवादाच्या कायद्यातील तरतुदीनुसार सोडविला जाईल. तसेच त्याकामी मा. आयुक्त पि.चि.मनपा यांचा एक पर्यायी लवाद राहील. लवादाचा निर्णय उभय पक्षावर बंधनकारक राहील.

४५)न्यायालयीन वाद उद्भवल्यास पुणे-पिंपरी न्यायालय कार्यक्षेत्र राहील.

४६)कोणतेही कारण न देता निविदा पुर्णतः किंवा अंशतः मंजूर अथवा नामंजूर करणेचा अधिकार मा. आयुक्त यांनी राखून ठेवला आहे.

२०७.

४७)काम चालू करण्यापूर्वी, काम चालू असताना, काम पूर्ण झाल्यानंतर, स्वखर्चाने कामाचे फोटो नस्तीबध्द/अपलोडींग करणे हे ठेकेदारावर बंधनकारक राहील.

४८)सी.सी.टी.व्ही. संबधितचे कामांना सोबत जोडलेल्या Special Terms & Conditions (विशेष निविदा अटी-शर्ती) बंधनकारक आहेत.

४९)विद्युत/उर्जा/अग्निशमन लेखापरीक्षण कामाकरीता संबंधित निविदाकाराने केलेल्या तांत्रिक शिफारशींबाबत तांत्रिक विवरण (Technical BOQ) निविदेसोबत सादर करणे अनिवार्य राहील.

५०) नवीन ध्वनीक्षेपन यंत्रणेचे उत्पादित कंपनीचे देखभाल दुरुस्तीचे कामाकरीता Authorisation Service Center महाराष्ट्रात असणे बंधनकारक राहील.

५१)Electric safety Audit कामाकरीता BEE/MEDA यांचेकडील मान्यताप्राप्त अनुज्ञाप्ती (Certification) आवश्यक आहे.

५२)पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडील स्थापत्य व विद्युत विषयक एकत्रित निविदेमधील मनपाकडील सह शहर अभियंता (वि) यांचेमार्फत जे काम सबलेट केले असल्यास व संबधित कार्यकारी अभियंता(वि) यांचेकडील प्रमाणित अनुभवाचा दाखला विचारात घेतला जाईल. तसेच स्थापत्य विद्युत एकत्रित कामाचे Partially Completion अनुभवाचा दाखला ग्राह्य धरण्यात येईल.

**५३) 30% व त्यापेक्षा अधिक कमी निविदादर असलेल्या कामांचे कार्यप्रणालीबाबत खालीलप्रमाणे नमुद केलेनुसार ठेकेदारांना बंधनकारक राहील :-**

a) ज्या कामांचा निविदादार ३०% कमी व त्या पेक्षा अधिक कमी असा आहे ती कामे विशेष काळजी घेणेची कामे म्हणून घोषित करणेत येत आहे.

b) सदर कामातील प्रत्येक बाबीचे काम सुरु करण्यापूर्वीचे व नंतरचे सविस्तर छायाचि "Time Stamp camera" या app च्या माध्यमातून घेण्यात येतील व नस्तीबध्द करण्यात येतील. छायाचित्र Latitude व longitude सहीत असतील.

c) सदर कामामध्ये वापरण्यात आलेल्या यंत्रसामुग्रीचे GST सहित मुळ चलनांचे छायांकित प्रत बिलासोबत सादर करणे आवश्यक आहे.

d) चलनामध्ये नमुद केलेल्या पुरवठादाराकडून साहित्य घेतलेल्या GST पावत्या सादर करणे आवश्यक आहे.

e) सदर कामाची कमीत कमी ३ RA बिलांपर्यंत बिल अदायगी करणेत येईल. प्रत्येक बिलाची रक्कम ही निविदा रक्कमेच्या ४०% पेक्षा जास्त नसेल व प्रत्येक RA बिलाची तांत्रिक तांत्रिक मान्यता घेण्यात येईल.

f) सदर कामांच्या बिलातील कमीतकमी ५० % मोजमापाचे इतर उपविभागातील उपअभियंता यांचेकडून पुर्नतपासणी करणे येईल.

५४) कोणतेही कारण न देता सदर कामाची निविदा नाकारणे किंवा रद्द करणेचा अधिकार मा. आयुक्त किंवा त्यांनी नियुक्त केलेल्या प्राधिकाऱ्यांनी राखून ठेवला आहे.

जावक क्र. विमुका/०५/काावि/३४५/२०२४
दि. ०२/०५/२०२४

(शेखर सिंह)
मा. आयुक्त सो.
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

Signature Not Verified
Digitally signed by SHAM N GAVHANE
Date: 2026.05.12 11:55:16 IST
Location: Maharashtra-MH